# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००२८११**

**अपिलार्थी श्री. रामसेवक मौर्या**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी, श्रेणी-२**
सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०९.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २९.०५.२०२५ | ०१.०७.२०२५ | १७.०७.२०२५ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १२.११.२०२५ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०१.०७.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २९.०५.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(1) Provide the inspection of the file Swapnpurty (SRA) sahakari Ghruh Nirman sanstha (praposed)*
*(2) Provide the copy of document which I may require.*

३. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. ०१.०७.२०२५ रोजी अपिलार्थींना कळविले की, स्वप्नपुर्ती एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो), सिटीएसं नं. ८३९, बी एम. मार्ग, मुंबई- ४०० ०१३ ही संस्था नोंदणीकृत नसल्यामुळे सदर संस्थेबाबतची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही.

अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १७.०७.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती देण्यात आलेली नाही.

..२/-

५. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना कळविले होते की, संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत नसल्याने संस्थेची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, सदर उत्तर योग्य नाही. कारण संस्था नोंदणीपूर्वी सुध्दा सहाय्यक निबंधक, सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि संबंधीत संस्थेमध्ये पत्रव्यवहार होत असतो व परिपत्रक क्र. ८०, दि. १५.०२.२००८ प्रमाणे विकासकाची निवड होत असताना सर्वसाधारण सभेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे प्रतिनिधी उपस्थित असतात. म्हणून संबंधीत अभिलेख उपलब्ध करुन देण्याची विनंती केली.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेखाचे निरीक्षण अपिलार्थींना देण्यास मान्य केले.

७. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना लेखी कळवून स्वप्नपुर्ती एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो), सिटीएसं नं. ८३९, बी एम. मार्ग, मुंबई- ४०० ०१३ या संस्थेशी संबंधीत उपलब्ध अभिलेख अपिलार्थींना निरीक्षणासाठी द्यावे व त्यापैकी हवे असलेले अभिलेख अपिलार्थींना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०७.०९.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

7-9-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**